तुमचे नांव............................



# अभ्यास एक




# येशु ख्रिस्त कोण आहे?

*वर आपले नांव लिहा आणि मोकळ्या जागी शास्त्र संदर्भ लिहा.*

## इतर लोक त्याच्याविषयी काय म्हणाले



**काळाच्या चकामध्ये भुतकाळात जाणे**

कल्पना करा की तुम्ही विमानामध्ये प्रवास करीत आहात कोणत्या तरी ठिकाणी जाण्यासाठी नाही परंतु २००० वर्षे भुतकाळामध्येॐ तुम्ही इस्त्राएल या देशामध्ये उतरता व तुम्हाला कळून येतं की प्रत्येक जण येशू नावाच्या मनुष्यावद्दल बोलत आहेत जो नासरेथ या शहरामधील आहे. कांही लोकांना तो आवडतो परंतु कांही लोक त्याचा द्वेष करतात. कांहीजण म्हणतात तो त्रासदायक व फसवणारा आहे[१] तर कांही म्हणतात तो देवाचा विशेष संदेष्टा आहे. तरी कांही म्हणतात की तो देवाचा पुत्र ख्रिस्त आहे.

जेंव्हा तुम्ही त्यांचं ऐकता तेंव्हा तुम्हाला खरंच आश्चर्य वाटतं की तो कांही लोकांमध्ये अशाप्रकारच्या शत्रुत्वाच्या भावना भडकवू शकतो त्याचप्रमाणे कांही लोकांचं प्रेम व भक्ती जिंकू शकतो. जेंव्हा तुम्ही त्याला पहाता तेंव्हा तुम्हाला हे स्पष्ट होतं की ती व्यक्ती विलक्षण दयाळू, स्पष्टवक्ता आणि धाडसी आहे!

या अभ्यासामध्ये लोक येशु बद्दल काय म्हणतात व येशु स्वतःबद्दल काय म्हणतो यावर विचार करणार आहोत. पहिली टिप्पणीः

### लोकसमुदायाची उत्सुकता

**त्याने बरेच मोठे लोकसमुदाय आकर्षित केले**

मोठा लोकसमुदाय येशूचं ऐकण्यासाठी व आरोग्यासाठी जमत होता. **लुक ५ः१५ लिहा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

### कांही जणांची मते

येशू बद्दलच्या विविध दृष्टिकोनांसाठी मत्तय १६ः१३-१६ वाचा. **वचन १६ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

इतर लोकांच्या येशू बद्दल मतांबद्दल या पानाच्या तळाशी असलेली टिप्पणी वाचा.[२]

**ऐतिहासीक टिप्पणी:**
ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवनाची सुरूवात रोमी राजा कैसर औगुस्त याच्या कारकीर्दीमध्ये झाली. ख्रि. पू. २७ - ई.स. १४

[१] योहान ७ः१२

[२] विरोधी वृत्ती (योहान ७ः१२); प्रीती (मत्तय २६ः७); भक्ती (मत्तय १४ः३३)

# येशु स्वतः बद्दल काय म्हणतो



मोर जितका
गर्वीष्ट तितका

कांही लोक मोरासारखे असतात, अगदी अभीमानाने ते स्वतःचं गौरव प्रदर्शीत करतात. आपण कोण आहोत व आपण काय करू शकतो याबद्दल ते गर्विष्ठ असतात. आपण कोणीतरी महत्त्वाचे आहोत ही गोष्ट त्यांना फार आवडते. लवकरंच हे लोक कसे आहेत ते आपल्याला कळते मग नंतर त्यांच्याबद्दल आपल्याला कांहीच रस वाटत नाही. परंतु जेंव्हा येशू सारख्या नैतीक गुणांचा मनुष्य बोलतो तेंव्हा ते गांभीर्याने घेतलेच पाहिजे. येशू सारखा नम्र आणि निस्वार्थी वृत्तीचा मनुष्य कांही गोष्टी सत्य असल्याशिवाय बोलेलच कसा? आपण पाहिलं की इतर लोक येशू विषयी काय म्हणाले. आता आपण पाहुया की येशु स्वतःबद्दल काय म्हणाला.

## येशुचे दावे



येशु एकतर वेडा होता किंवा तो खरं सांगत होता

येशु ज्याप्रमाणे बोलला त्याप्रमाणे कोणताच इतर पुढारी किंवा संदेष्टे स्वतःबद्दल बोलले नाहीत. त्यांनी लोकांना देवाकडे निर्देश दिला, परंतु येशु लोकांना स्वतःकडे निर्देश देत होता. त्याने स्वतःला देवाकडे जाण्याचा मार्ग व मनुष्याच्या सर्वात म्हत्त्वाच्या गरजेचं निरसन म्हणून घोषित केले. याबद्दल कांहीच शंका नाही की बरयाच लोकांना त्याचं बोलणं निंदास्पद व देवाप्रती अपमानास्पद वाटले. ते एकतर त्याच्यावर विश्वास ठेवण्यास किंवा दोषी ठरविण्यास प्रवृत्त होत असंत!

येशुने स्वतः जिवनाची भाकर, जगाचा प्रकाश व तारणाचा दरवाजा म्हणून दावा केला.[३] त्याने स्वतःला देवाकडे जाण्याचा मार्ग म्हणून घोषित केले. **योहान १४:६ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

## सर्व गोष्टी अस्तीत्वात येण्याअगोदर अस्तीत्वात असण्याचा दावा

समयाची सुरूवात होण्याअगोदर

जग निर्माण होण्याअगोदरच्या वेळेविषयी येशु बोलत होता, जेंव्हा तो देवाजवळ रहात होता.
**योहान १७:१५ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

तो अब्राहमा अगोदर अस्तीत्वात होता असण्याचा दावा करीत होता- जो मनुष्य आपण येशू नंतर जितक्या वर्षांनी जन्मलो तितकीच वर्षे अगोदर अब्राहम येशूच्या अगोदर होऊन गेला.[४]

## देवाचा पुत्र असण्याचा दावा

सर्वसमर्थ देवाचा पुत्र

शेवटी येशुने देवाला स्वतःचा पिता म्हणून घोषित करून तो देवाचा विशेष पुत्र आहे हे त्याने कबूल केले. ह्याद्वारे आपण देवाबरोबर एक आहोत असा त्याने दावा केला.
**योहान ५:१८ लिहून काढा.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

[३] योहान ६:३५ योहान ८:१२ योहान १०:९
[४] योहान ८:५६५८

# येशुचे चमत्कार काय दर्शवीतात



चिन्हांना एक विशिष्ट अर्थ आहे

आपल्या अवतीभोवती चिन्ह आहेत- आणि त्या सर्व चिन्हांना कोणत्यातरी प्रकारचा अर्थ आहे. चालक लोकांना त्यांच्या उजवीकडील चिन्ह त्यांना काळजी घ्यावयास सांगते कारण लोक काम करीत आहेत. जे चमत्कार येशुने केले ती देखील चिन्हे होती व त्यांना कांहीतरी अर्थ आहे. येशूने केलेले सर्व चमत्कारीक चिन्ह मत्तयकृत शुभवर्तमान, मार्ककृत शुभवर्तमान, लुककृत शुभवर्तमान, व योहानकृत शुभवर्तमान यामध्ये नमूद केलेली आहेत. या चमत्कारांमधील बरेच चमत्कार ख्रिस्ताच्या दयाळूपणाची कृत्ये होती. त्याने रोग्यांना बरे केले लंगडयांना चालण्यासाठी शक्ती दिली व आंधळयांना दृष्टी दिली.[५] त्याने मेलेल्यास देखील मरणातून उठवीले.

परंतू येशुने असे चमत्कार देखील केले की ज्यांच्याद्वारे त्याने निसर्गावर आपले सामर्थ्य दाखवीले. तो पाण्यावर चालला वादळे शांत केली हजारो भुकेल्या लोकांना अन्न दिले. एक वेळी तर त्याने पाण्याचा द्राक्षारस केला.

## येशुने केलेल्या चिन्हांचा अर्थ

येशुची चिन्हे

ज्या गोष्टी येशु स्वतःबद्दल बोलला त्या सिध्द् करण्याकरीता येशुचे चमत्कार होते.[६] ही चिन्हे हे दाखविण्यासाठी होते की येशू हा खरोखरच देवाचा पुत्र होता. **योहान २०:३० -३१ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

## येशुने चिन्हे का दिली

आता कोणतीच सबब नाही

कोणालाही विश्वास ठेवण्यासाठी चिन्हांची गरज भासणे आवश्यक नाही.[७] येशूने चमत्कार केले कारण त्यांना आपल्या अविश्वासासाठी कोणतीच सबब असू नये.योहान १५:२२ -२४ वाचा. **वचन २४ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

त्याचे चमत्कार आम्हासाठी नमूद केलेले आहेत, यासाठी की आम्हाला देखील कोणतीच सबब राहू नये.

# स्वतःचे एक मत बनवणे



पुराव्यांना तपासून पाहणे

न्यायालये यासाठीच असतात की सर्व पुरावे तपासून सत्याचा शोध लावला जावा. त्याचप्रमाणे नवीन कराराच्या लेखकांची हीच ईच्छा आहे की आपण देखील येशु बद्दलचे पुरावे तपासून पहावेत-आणि हा कोर्स हीच गोष्ट साध्य करण्यासाठी आहे. तुम्ही न्यायालयाचे पंच आहात व येशुचे शिष्य (प्रेषित) साक्षीदार आहेत. **प्रेषितांची कृत्ये २:३२ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

[५] मत्तय १५:३० ३१

[६] योहान १०:२५ आणि प्रे. कृ. २:२२

[७] मत्तय १२:३८३९ आणि योहान २०:२९

तपासण्याकरीता आणखी कांहीतरी

## पुढील पुरावाः येशुने पापांची क्षमा केली

येशू स्वतःबद्दल ज्या गोष्टी बोलला व त्याने जे चमत्कार केले त्यांचं महत्त्व तुम्ही तोलून पहात आहात. येशुने ज्याप्रकारे पापांची क्षमा केली तेसुध्दा तुम्ही विचाराधीन घेतलं पाहिजे. कोणताही संदेष्टा किंवा धार्मीक पुढारी ते करू शकला नाही कारण केवळ देवच पापांची क्षमा करू शकतो. एखादया् व्यक्तीच्या पापांची क्षमा झाली असे जाहीर केल्यामुळे येशुने कित्येक लोकांचा रोष पत्करावा लागला कारण त्याच्या या बोलण्यातून तो देव असल्याचा अर्थ निघत होता. लुक ५ः१८-२१. **वचन २० व २१ लिहून काढा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अतःकरण पाहणे

याचा अर्थ असा देखील होत होता की येशु एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणातील गोष्टी वाचू शकत होता व त्याला हे कळू शकत होतं की कोण केंव्हा खरंच पश्चात्तापी होत असे.[८]

## आणखी कांही पुरावेः कुमारीके पासुन जन्म

येशुबद्दल एका मताप्रत पोहंचण्यासाठी नवीन कराराचे लेखक त्याच्या जन्माविषयी काय म्हणतात हे देखील तोलून पाहायला पाहिजे. ते अगदी सरळपणे असे लिहीतात की त्याचा जन्म कुमारीके पासून झाला-अशा स्त्रीपासून जीने पुरूषाला कधी जाणलेच नाही! देवाच्या आत्म्याद्वारे त्याची गर्भधारणा झाली. लुक १ः२६- ३५ वाचा. **वचन ३५ लिहून काढा**



**सर्वसमर्थ देवाला कांही गोष्टी खुप कठीण आहेत का?**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

इतर लोकांपेक्षा वेगळा म्हणून येशुची ओळख होती. याद्वारे हेच सिध्द् होतं की तो माणसापेक्षा अधिक होता-तो देव होता.[९]

## निष्कर्ष

तुमचा निष्कर्ष काय आहे? पृथ्वीवरील येशुचे वास्तव्याची सुरूवात एका विशीष्ट मार्गाने झाली व त्याचप्रमाणे त्याने जग देखील त्याचप्रकारे विशिष्ट मार्गाने सोडले. त्याचे मरण हा त्याचा शेवट नव्हता. तो जिवंत होणार होता व परत कधीच मरणार नव्हता.

**ऐतिहासीक टिप्पणी:** ज्यावेळी येशु कुसावरील वेदनादायी मरण मेला त्यावेळी तो ३३ वर्षाचा होता. परंतु तो त्याचा शेवट नव्हता!

येशुचं पुनरूत्थान ही एक ऐतीहासीक घटना आहे, व इतकी महत्त्वाची आहे की त्याच्यावर आपला एक विशेष अभ्यास असणार आहे.

मग, येशु ख्रिस्त कोण आहे? त्याच्या काळातील लोकांवर त्याने अस्भूत प्रभाव पाडला. ज्याप्रकारे तुम्हाला त्याच्या बद्दलच्या सत्यावद्दल शोध लावायचा आहे त्याचप्रकारे त्या लोकांना देखील त्याच्याबद्दलच्या सत्याचा शोध लावायचा होता. परंतु त्याच व्यक्तीकडे पहात असता लोक भिन्न निष्कर्षाप्रत आले.

न्यायप्रविष्ट मंडळाचे एक सदस्य या नात्याने तुम्हाला निकाल द्यावा लागेल. त्याचा शिष्य थोमा याच्याप्रमाणे तुम्ही असे म्हणाल का की तो तुमचा देव व तुमचा प्रभु आहे?[१०]

---

[८] आणखीन कांही घटनांसाठी लुक ७ः३६५० पाहा

[९] मत्तय १ः२३ (शब्दसमूह पाहः "आम्हासन्नीध्द् देव")

[१०] योहान २०ः२८